International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.688
Volume 4, Issue 4, Oct-Dec 2024 ID: IJCRTA0000181 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

# कॉम्रेड अण्णा भाऊ साठे यांचा साम्यवादी विचार: एक अभ्यास

**सूर्यवंशी राजू शिवाजी* & प्रा. डॉ. माधव माणिकराव चोले****

**Author Affiliation:**
*संशोधक, राज्यशास्त्र विभाग, देगलूर महाविद्यालय देगलूर, ई-मेल: rssraju1925@gmail.com
**संशोधन मार्गदर्शक, राज्यशास्त्र विभाग, देगलूर महाविद्यालय देगलूर,

**Citation of Article**: सूर्यवंशी, आर. एस., & चोले, एम. एम. (2024). कॉम्रेड अण्णा भाऊ साठे यांचा साम्यवादी विचार: एक अभ्यास. International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA) ISSN: 2583- 1801, 4 (4), pg. 101-105. ijcrta.org

**DOI:** **10.5281/zenodo.15287317**

**प्रस्तावना:**

कॉम्रेड अण्णा भाऊ साठे यांनी समाजाच्या स्थिती-गतीचे प्रतिबिंब दाखवण्याचे आणि शोषितांच्या आवाजाला बळ देण्याचे कार्य केले. मराठी साहित्यविश्वात कॉ. अण्णा भाऊ साठे हे असे साहित्यिक होते, ज्यांनी आपल्या लेखनाद्वारे समाजातील वंचित आणि उपेक्षित घटकांच्या व्यथा-वेदनांना शब्दबद्ध केले. त्यांच्या साहित्यात जात आणि वर्गसंघर्ष, सामाजिक न्याय, आर्थिक विषमता आणि साम्यवादी विचारधारेचा प्रभाव प्रकर्षाने जाणवतो. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये 'कॉम्रेड अण्णा भाऊ साठे यांचा साम्यवादी विचार: एक अभ्यास' या विषयावर आधारित आहे. अण्णा भाऊ साठे यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील वाटेगाव या गावी झाला. त्यांचे बालपण गरिबीत आणि सामाजिक उपेक्षेच्या छायेखाली गेले. शिक्षणाची अपुरी संधी, जातीय व्यवस्था आणि आर्थिक विषमता यामुळे त्यांनी लहान वयातच जीवनाचा संघर्ष अनुभवला. याच संघर्षाने त्यांच्या विचारांना धार दिली. औपचारिक शिक्षण नसतानाही त्यांनी अनुभवातून स्वतः घडले आणि साहित्याच्या माध्यमातून आपल्या भावना आणि विचार लोकांसमोर मांडले. त्यांच्या लेखनातील प्रभावी शैली, साधी-सोपी भाषा आणि पात्रांचे वास्तववादी चित्रण यामुळे ते लोकशाहीर म्हणून प्रसिद्ध झाले. कॉ.अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य हे केवळ कथा आणि मनोरंजनासाठी मर्यादित नव्हते. त्यांनी आपल्या कथांमध्ये दलित,वंचित आणि शोषित समाजाच्या व्यथा प्रखरपणे मांडले आहे. त्यांच्या साहित्यात सामाजिक संघर्ष, वर्गसंघर्ष आणि विद्रोहाचे स्वरूप ठळकपणे दिसून येते. त्यांच्या 'फकिरा' या कादंबरीत ग्रामीण भारतातील आर्थिक आणि सामाजिक विषमता,ब्रिटिश सत्तेला विरोध करणाऱ्या पात्राची प्रभावी मांडणी केली आहे तर 'लाल बावटा कला पथक' स्थापन करून लोककला,नाटक, वगनाट्य आणि गीतांद्वारे जनजागृती घडवली. कॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यावर मार्क्सवादी विचारधारेचा प्रभाव दिसून येतो त्याचे 'इनामदार' या लोकनाट्यामधून त्यांनी शेतकरी कामगार यांचे भांडवलदर वर्गाकडून होणारे शोषण आणि त्याचा प्रतिकार करणारा मुकुंदा याचा संघर्ष त्यांनी प्रखंरपणे मांडले आहे.

**'धनवंतांनी अखंड पिळले,**
**धर्मांधांनी तसेच छळले'**

या ओळीतून त्यांनी भारतीय जनतेच्या शोषणाची आर्थिक, सांस्कृतिक द्विमुखी रचना अधोरेखित केली आहे.शोषणाच्या आर्थिक आणि सांस्कृतिक पैलूकडे कॉम्रेड अण्णा भाऊ साठे आपले लक्ष वेधतात. सांस्कृतिक आर्थिक आणि राजकीय क्रांत्याचे परस्परावलंबित्व आणि परस्परपूरकता ते दाखवितात शेवटी अण्णा भाऊचे हे गीत आजच्या सांस्कृतिक परिवर्तनासाठी मार्गदर्शनपर ठरत आहे. त्यांनी साम्यवादाच्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केला आणि समाजातील वर्गविभाजन संपवण्यासाठी क्रांतीची हाक दिली. त्यांच्या लेखनातील बंडखोरी, क्रांतीशील विचारसरणी आणि सामाजिक परिवर्तनाची आकांक्षा आजही समकालीन संदर्भात महत्त्वाची वाटते.

प्रस्तुत शोध निबंधामध्ये कॉम्रेड अण्णा भाऊ साठे यांच्या साम्यवादी विचाराचा अभ्यास आणि त्यांच्या साहित्यातील सामाजिक, आर्थिक विषमता याचा अभ्यास करणार आहोत. प्रस्तुत संशोधनासाठी ऐतीहासिक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे त्यात तथ्य संकलनासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर केलेला आहे. त्यात कॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यावर आधारीत असलेल्या विद्यमान साहित्य, लेख, निबंध, ,समीक्षकांची मते,पाक्षिक, पुस्तके, वर्तमानपत्रे आणि प्रकाशित नियतकालिके याचा संदर्भ घेतला आहे.

**साम्यवादाचा प्रभाव:**

कॉम्रेड अण्णा भाऊ साठे यांच्या समग्र साहित्यावर साम्यवादी तत्वज्ञानाचा प्रभाव दिसून येतो,ज्यामुळे त्यांच्या लेखनात समाजातल्या आर्थिक असमानतेचा विरोध आणि समतावादी दृष्टिकोन प्रकट होतो. ‘फकिरा’ आणि ‘इनामदार’, ’स्मशानातील सोनं’ या साहित्यकृतीतून त्यांनी जातीभेद आणि वर्गभेद नष्ट करणे, शोषितांना न्याय देणे आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान अधिकार, न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी उभे केलेले पात्र संघर्ष करतात.
कॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यावर साम्यवादाचा प्रभाव प्रगल्भ होता. पोवाडा, लावणी, लोकनाट्य, कथा, कादंबरी यांच्या माध्यमातून संयुक्त महाराष्ट्र लढा,मुंबई लढ्याचा इतिहास त्यांनी मांडला तर दुसरीकडे दुसऱ्या महायुद्धातील स्टॅलिन ग्राडच्या अविस्मरणीय लढ्याची गाथा सांगितली, बर्लिनचा पोवाडा लिहून नाझीशाहीच्या निर्दालनाची कथा सांगितली, तेलंगणाच्या संग्रामाचे कथन पोवाड्यात केले. या सर्व घटना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील कम्युनिस्ट चळवळीशी संबंधित होत्या. समाजातील शोषण, आर्थिक विषमता आणि वर्गसंघर्षावर त्यांनी प्रकाश टाकला. कॉ.अण्णा भाऊ साठे यांचा विश्वास होता की, सामाजिक परिवर्तनासाठी साम्यवाद हे सर्वोत्तम तत्त्वज्ञान आहे, कारण ते शोषणमुक्त, समतावादी समाज निर्माण करण्याचा विचार आहे. त्यांच्या लेखनात कामगार, शेतकरी, मजूर, दलित वर्ग आणि शोषितांची वास्तव स्थिती दर्शवली. आपल्या साहित्याद्वारे समाजातील सर्व स्तरांतील लोकांना जागरूक करण्याचा प्रयत्न केला आणि शोषणाविरुद्ध बंड उभारण्यासाठी प्रेरणा दिली. त्यांच्या विचारांनुसार, साम्यवादाला स्वीकारल्यास समाजात असलेल्या विविध वर्गांमधील भेद समाप्त होऊ शकतात. अशा दृष्टीने त्यांनी मांडणी केली.

लोकशाहीर म्हणून यांनी आपल्या साहित्याद्वारे सामाजिक जागृती केली. त्यांनी नाटकं, पोवाडे आणि गाण्यांच्या माध्यमातून जनतेत जागरूकता निर्माण केली आणि त्यांना सामूहिक संघर्षासाठी प्रेरित केले. त्यांच्या साहित्याचे योगदान केवळ साहित्यिक नसून, ते समाजातील बदलांसाठी एक प्रेरणा ठरले. त्यांच्या लेखनात साम्यवादाची तत्त्वे, सामाजिक न्याय, समानता आणि वर्गविभाजनाविरुद्धचा संघर्ष उभा आहे, ज्यामुळे ते समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेत महत्त्वाचे ठरतात. ‘लाल बावटा कला पथक’ या कलापथकाच्या माध्यमातून शाहीर अमर शेख, द.ना.गव्हाणकर यांच्या साथीने

International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.688
Volume 4, Issue 4, Oct-Dec 2024 ID: IJCRTA0000181 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

संयुक्त महाराष्ट्राचा लढा, सामाजिक, राजकीय, व सांस्कृतिक प्रबोधनात्मक कार्यक्रमातून क्रांतिकारी विचाराने संपूर्ण महाराष्ट्रात परिवर्तनाची ठिणगी त्यांनी पेटवली.

कॉ.अण्णा भाऊ साठे हे एक प्रभावी लोकशाहीर होते, ज्यांनी आपल्या कलेचा उपयोग समाजातील शोषित, सर्वहारा वर्गाच्या आवाजाला बळ दिले. त्यांनी कथा,कादंबरी,पोवाडे,लोकनाट्य आणि समग्र साहित्याद्वारे सामाजिक विषमता,अन्याय आणि शोषणाविरुद्ध जागरूकता निर्माण केली. लोककलेच्या माध्यमातून समाजप्रबोधन आणि साम्यवादी विचारधारेचा प्रचार व प्रसार केला. त्यांच्या साहित्यात सामाजिक बंधने जातीभेद आणि वर्गभेद नष्ट करण्यासाठीची प्रेरणा होती. त्यांची माणसावर आणि माणसाच्या कष्टावर नितांत आदर होता म्हणून माणसांना विद्रुप करणे त्यांना मान्य नव्हते. त्यामुळे ते लोकशाहीर म्हणून आदर्श ठरले.

**माझा रशियाचा प्रवास:**

मुंबईच्या कामगार जीवनात मार्क्सवादाने प्रभावित झाल्यानंतर कॉम्रेड अण्णा भाऊ साठे यांच्या मनात समाजवादी देशाबद्दल आस्था निर्माण झाली. समाजवादी रशिया खरोखरच शोषनमुक्त आहे का? रशियन माणसांनी केलेला प्रचंड संघर्ष,विद्रोह, त्यांनी गाजवलेले शौर्य आणि त्यातून घडलेल्या क्रांती बद्दल कॉम्रेड अण्णा भाऊ साठे यांना मोठे आकर्षण होते. एका मोठ्या विद्रोहानंतर अस्तित्वात येणारी व्यवस्था नेमकी कशी असेल? हे त्यांना जाणून घ्यायचे होते मार्क्सवाद आणि लेनिन, स्टॅलिनच्या संघर्षामुळे झालेले परिवर्तन अनुभवायचे होते. रशियन माणसाचे सन्मानाने जगणे आणि त्या जगण्यामागील तत्त्वज्ञान शोधण्यासाठी कॉम्रेड अण्णा भाऊ साठे यांचा रशियाचा प्रवास हा महत्वपूर्ण ठरतो.

रशियात गेल्यानंतर कॉम्रेड अण्णा भाऊ साठे म्हणतात "मला या देशातील फक्त फुटपाथन फिरायचं आहे" कारण समाजवादी रशियात एखादा दरिद्री, भिकारी, गुलाम माणूस सापडतो का? याचा शोध कॉम्रेड अण्णा भाऊंनी घेतला परंतु त्यांना रशियामध्ये सर्वत्र आर्थिक समता, स्वातंत्र्य आणि सामाजिक न्याय पहावयास मिळाले. थोडक्यात एका बंडखोर लेखक कलावंताने चिकित्सक बुद्धीने एका क्रांतिकारी देशाचा केलेला अभ्यास म्हणजे 'माझा रशियाचा प्रवास' होय.

**सामाजिक आणि आर्थिक विषमता संबंधीचे विश्लेषण**:

कॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या लेखनात सामाजिक संघर्ष आणि वर्गसंघर्ष हे मुख्य विषय होते. सामाजिक संघर्ष म्हणजे समाजातल्या वेगवेगळया गटांमधील असमानतेमुळे होणारा संघर्ष.कॉ अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याने शोषित, वंचित आणि दलित, पीडित सर्वहारा वर्गाच्या संघर्षाला महत्व दिले. त्यांचे पात्रे या वर्गाच्या जीवनातील आर्थिक, जातीय आणि सामाजिक विषमतांशी झुंजत होती. त्यांच्या लेखनात संघर्ष केवळ व्यक्तीचा नसून, संपूर्ण समाजव्यवस्थेचा होता. वर्गसंघर्ष हा मुळात समाजातील दोन प्रमुख वर्गांमध्ये श्रीमंत आणि गरीब यामधील द्वंद्व त्यांच्या साहित्यात प्रकर्षाने मांडताना दिसतात आणि अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याने हे द्वंद्व स्पष्ट केले आणि त्यातले शोषण, दडपशाही, आणि असमानतेची चित्रे दिली. त्यांच्या कादंबऱ्यामध्ये श्रमिक, शेतकरी,मजूर व दलित वर्गांची शोषित स्थिती आणि त्यांचा विद्रोह यांचे सखोल चित्रण आहे. त्यांच्या ‘फकिरा’ कादंबरीत शोषित वर्गाच्या संघर्षाचे प्रगल्भ रूप दिसते. त्यांचा वर्गसंघर्षात विश्वास होता, सामूहिक बंडखोरी आणि एकत्रित क्रांतीद्वारेच शोषणमुक्त समाज उभा केला जाऊ शकतो. त्यासाठी त्यांनी साम्यवादाच्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केला, ज्यातून समाजात वर्गवाचक भेद नष्ट होण्याची

International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.688
Volume 4, Issue 4, Oct-Dec 2024 ID: IJCRTA0000181 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

शक्यता आहे. त्यांच्या साहित्याने सामाजिक असमानतेच्या विरोधात जागरूकता निर्माण केली आणि त्या काळातल्या शोषणकारी व्यवस्थेचा प्रतिकार करण्याची आवश्यकता दर्शवली. कॉम्रेड अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य समाज परिवर्तनासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले. त्यांचं लेखन शोषण, जातीय विषमता आणि वर्गभेदाविरुद्ध तीव्र विरोध व्यक्त करते. त्यांनी आपल्या कादंब-यांमधून शोषित आणि वंचित वर्गाच्या दु:खद स्थितीचे चित्रण केलं. त्यांच्या लेखनात सामाजिक बदलाची आवश्यकता आणि त्या बदलांसाठी संघर्षाची आवश्यकता असल्याचे सांगतात. 'फकिरा','चित्रा' 'वैजयंता','वारणेचा वाघ' यासारख्या कादंबऱ्यामधून त्यांनी असमानतेच्या विरोधात विद्रोहाची वकालत केली. त्यांचे साहित्य समाजातील विषमतेचा प्रतिकार करणारे आणि साम्यवादी विचारधारेचे समर्थन करणारे आहे. यांच्या साहित्याने लोकांना सामाजिक न्याय, समानता आणि सन्मानाने जीवन जगण्यासाठी संघर्ष करणारी पात्र त्यांनी आपल्या साहित्यात उभे केले. ज्यामुळे त्यांचं साहित्य समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेत महत्त्वपूर्ण ठरले आहे.

**निष्कर्ष:**

कॉम्रेड अण्णा भाऊ साठे यांचा साम्यवादी विचार :एक अभ्यास सदर शोध निबंधाचा अभ्यास करतांना,समाजातील विषमता, दारिद्र्य, शोषण, जातीय आणि वर्गसंघर्ष, यांची प्रामुख्याने मांडणी केलेली दिसते. त्यानी सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिवर्तनासाठी संघर्षाची आवश्यकता स्पष्ट केली. सामाजिक आणि आर्थिक विषमतेच्या विरोधात आवाज उठवला. सामाजिक परिवर्तनाचा विचार मांडला. त्यांच्या लेखनात जात आणि वर्गसंघर्ष हे प्रमुख घटक आहेत. ज्यामध्ये श्रमिक, शोषित,कामगार,शेतकरी,दलित वर्गाच्या शोषणाविरुद्धचा संघर्ष मांडलेला आहे.

कॉ.अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य एक अशा समाजाच्या कल्पनांना आकार देते, ज्यात प्रत्येकाला समान अधिकार, सन्मानपूर्वक जगणे मिळावे आणि संपूर्ण शोषणातून मानवाची मुक्तता झाली पाहिजे. आजही समाजातील शोषित, पीडित,वंचित,शेतमजूर,कामगार,दलित,उपेक्षित समाजातील शेवटच्या घटकासाठी त्यांचा विचार प्रासंगिक आहे.

**संदर्भसूची:**

1. साठे अण्णा भाऊ. फकिरा. पुणे: महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, १९५९.
2. डांगळे अर्जुन संपादित, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङमय, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई, प्रथम आवृत्ती 1998.
3. चौसाळकर अशोक, शिंदे रणधीर, संपादित 'युगांतर'मधील अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य,श्रमिक प्रतिष्ठान कोल्हापूर प्रथम आवृत्ती 2011.
4. डॉ.पी.विठ्ठल, डॉ.राजेश्वर दुडूकनाळे, जनवादी साहित्यिक अण्णा भाऊ साठे, डायमंड पब्लिकेशन पुणे,प्रथम आवृत्ती 1ऑगस्ट 2017.
5. साठे अण्णाभाऊ, माझा रशियाचा प्रवास,सुरेश एजन्सी 205 शुक्रवार पेठ पुणे, सहावी आवृत्ती 2005.
6. डॉ. झोंबाडे मनीषा, अण्णा भाऊ साठे समग्र साहित्य : एक चिंतन, सिद्धी क्रिएशन अँड प्रिंटर्स भोसरी पुणे, प्रथम आवृत्ती 1 ऑगस्ट 2024.
7. पाटील डॉ. एस. एस. "अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य आणि साम्यवाद." शोधप्रवृत्ती, 2020.
8. इंगोले स. क. (2022). अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील सामाजिक परिवर्तनवादी विचार. अण्णा भाऊ साठे जन्मशताब्दी विशेषांक, 95-100.

9. कांबळे उत्तम, कॉम्रेड अण्णा भाऊ साठे, सनय प्रकाशन, आनंदवाडी नारायणगाव, पुणे,1ऑगस्ट 2020.
10. प्रा.ठोंबरे तानाजी,आपले अण्णा भाऊ साठे, लोकवाङ्मय गृह,मुंबई. पहिली आवृत्ती जुलै 2021.
11. गुरव बाबुराव, अण्णा भाऊ साठे समाजविचार आणि साहित्यविवेचन,लोकवाङ्मय गृह, मुंबई, सहावी आवृत्ती जून 2019.
12. अण्णा भाऊ साठे जन्मशताब्दी स्मृती अंक, साधना साप्ताहिक 2020.
13. प्रा.डॉ. दुडूकनाळे राजेश्वर, विद्रोही कलावंत अण्णा भाऊ साठे,लोकायत प्रकाशन सातारा,प्रथम आवृत्ती नोव्हेंबर 2015.
14. प्रा.डॉ.शिवाजी जवळगेकर, जननायक अण्णा भाऊ साठे,साहित्यभूषण अण्णा भाऊ साठे कला अकादमी व संशोधन केंद्र,प्रथम आवृत्ती 2007.